ePaper

# ठाकरेंनी वर्षा बंगला सोडल्यावर टोपलीभर लिंबं सापडली, कदमांचा पलटवार!

| वर्ष - 8 | अंक - 341 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

## आतील पानांत

- मोहम्मद शमीचं पुनरागमन होणार!
- तर ऋषभने चौथा सामना खेळू नये
- ५ लढाऊ विमानांबद्दल सत्य काय आहे?
- संघ प्रणित संस्थेतर्फे ज्ञान सभा

www.mahaenews.com | रविवार, दि. 20 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

**Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune**

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



- 15k+ Students Placed
- 52 LPA Highest Package
- 50,000+ Alumni
- 1000+ Empanelled Recruiters
- 150+ University Toppers

## Our Institutes

**D Y Patil College of Engineering (Autonomous)**
*NRI Quota Open: AY 2025 – 26*
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

**D Y Patil Institute of MCA & Management**
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

**Dr D Y Patil College of Architecture**
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

**D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune**
*NRI Quota Open: AY 2025 – 26*
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

**Dr D Y Patil College of Agriculture Business Management**
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

**Dr D Y Patil College of Pharmacy**
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

**Dr D Y Patil Institute of Pharmacy**
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

**Y B Patil Polytechnic**
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK · wipro · NTT DATA · virtusa · B&R · Emcure · KNORR-BREMSE · NuLife · CitiusTech · SHL · McKinley Rice · bvg · Technoniq · RPG · NASSCOM FOUNDATION · INDOVANCE · Tech Mahindra · DataTech Labs · EMERSON · newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in | admission@dypakurdipune.edu.in | @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."

ePaper

ठाकरेंनी वर्षा बंगला सोडल्यावर टोपलीभर लिंबं सापडली, कदमांचा पलटवार!

| वर्ष - 8 | अंक - 341 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 20 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मोहम्मद शमीचं पुनरागमन होणार!
- तर ऋषभने चौथा सामना खेळू नये
- ५ लढाऊ विमानांबद्दल सत्य काय आहे?
- संघ प्रणित संस्थेतर्फे ज्ञान सभा


### स्थानिक शेतकऱ्यांना दहा टक्के जमीन परतावा

# विमानतळ भूसंपादनाचा तिढा सुटला!

## जमिनीसाठी शेतकऱ्यांना मिळणार चौपट मोबदला, बाधितांना रोजगार

। मुंबई/पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनाचा तिढा सुटला असून, जमिनीसाठी चौपट मोबदला आणि विमानतळाची उभारणी सुरू असतानाच स्थानिक शेतकऱ्यांना दहा टक्के जमीन परतावा, अशा स्वरूपात भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, बाधित शेतकऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यासाठी नोकरी व व्यवसाय प्रशिक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुरंदर व शिर्डी विमानतळांची आढावा बैठक गुरुवारी झाली. यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) २०१९ च्या पुनर्वसन धोरणानुसार पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ही भूसंपादन प्रक्रिया पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी लवकरात लवकर पूर्ण करावी, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

पुरंदर विमानतळासाठी सात गावांमधील सुमारे २ हजार ८०० एकर जमिनीची आवश्यकता आहे. यातील बऱ्याच गावांमध्ये विमानतळालाच विरोध केला जात आहे. मात्र, मध्यंतरी झालेल्या सुनावणीदरम्यान बऱ्याच शेतकऱ्यांनी भूसंपादनासाठी संमती देताना त्यासाठीचे पॅकेज लवकर जाहीर केले जावे, अशी मागणी केली होती. शेतकऱ्यांची मागणी विचारात घेऊन 'एमआयडीसी' कायद्यानुसारच भूसंपादन करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे या सात गावांतील शेतकऱ्यांना आता जमिनीसाठी नुकसान भरपाईसोबतच त्यांच्या संपादित केल्या जाणाऱ्या जमिनीच्या दहा टक्के परतावा जमिनीच्या स्वरूपात मिळणार आहे. औद्योगिक/व्यावसायिक/निवासी किंवा संमिश्र प्रयोजनासाठी औद्योगिक क्षेत्रात ही जमीन त्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा स्वाती पांडे, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी आदी उपस्थित होते.

> जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू करावी; जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. हा विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्रातील विमानसेवा अधिक सक्षम होईल.
> --देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



### या 7 गावांत भूसंपादन

वनपुरी, उदाची वाडी, एकतपूर, मुंजवडी, कुंभारवळण, पारगाव आणि खानवाडी

२,८३२ हेक्टर -पुरंदर विमानतळासाठी आवश्यक जमीन

### काय फायदा होणार ?

एमआयडीसी पुनर्वसन धोरणानुसार जमीन संपादन करण्यास संमती देणाऱ्यांना प्राधान्याने चौपट मोबदला

प्रकल्पबाधितांकडून वाटाघाटीने मंजूर झालेल्या दराने जमिनीचे संपादन करण्यात येते.

प्रकल्पबाधितांना एकूण मोबदल्यापैकी १० टक्के जमीन परतावा दिला जाणार

सर्व बाधितांना आवश्यकतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असून नोकरी व व्यवसाय प्रशिक्षण

### प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना किती मिळणार मोबदला?

राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना 10 टक्के विकसित भूखंड आणि चार पट मोबदला दिला जाणार आहे. पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांना एकूण जमिनीच्या 10 टक्के विकसित भूखंड परतावा म्हणून मिळणार आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना सध्याच्या बाजारभावाच्या 4 पट रक्कम रोख स्वरूपात देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे पुरंदर विमानतळ भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसंच कुटुंबातील सदस्यांना नोकरीच्या संधीही देण्यात येईल. संयुक्त मोजणी आणि प्रत्यक्ष मोबदला देण्यात येणार आहे. शिवाय आता 2019 च्या सुधारित कायद्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला दिला जाणार आहे.

### मोठ्या विमानांसाठी सोय करण्याची उपमुख्यमंत्र्यांची सूचना

पुरंदर विमानतळासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे आता या विमानतळासाठी लागणारी जमीन संपादित करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने सुरू करावी; जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल, असे फडणवीस म्हणाले. पुरंदर विमानतळावर मोठी विमाने उतरण्यासाठी आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्या.

# स्वच्छतेसाठी आवश्यक त्या उपाययोजना!

## कचराकोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने उचलले पाऊल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'विमानतळ परिसरातील खासगी मोकळ्या जागांवर कचरा तसेच राडारोडा आहे. अशा जागामालकांना सात दिवसांची नोटीस देऊन त्या तातडीने स्वच्छ कराव्यात. अन्यथा, महापालिका त्या जागा ताब्यात घेईल,' असा इशारा शनिवारी पुणे महापालिकेने दिला.**




लोहगाव विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरातील अनेक भागांत कचरा पडलेला असल्याने तेथे पक्ष्यांचा वावर वाढत असून या पक्ष्यांचा त्रास विमान उड्डाणावेळी आणि उतरवताना होतो. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शनिवारी या जागांची पाहणी करून तेथे स्वच्छतेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे अनिरुद्ध पावसकर, उपायुक्त माधव जगताप, संदीप कदम, प्रशांत ठोंबरे तसेच विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही याबाबत नुकतीच बैठक घेऊन सूचना केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर, ही पाहणी करण्यात आली.विमानतळ परिसरातील मोकळ्या जागांवर कचरा पडलेला असतो.

त्या जागा मालकांना नोटीस देऊन सात दिवसांत तेथे स्वच्छता करावी. अन्यथा, महाराष्ट्र महापालिका अधिनियम तरतुदीनुसार या जागा महापालिकेने आरोग्यास धोकादायक परिस्थिती निर्माण केल्याबाबत ताब्यात घ्याव्यात,' अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

'वाघोली येथील भाजी मंडईसह त्या परिसरातील स्वच्छता करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली जाईल. रस्त्यावर कचरा टाकला जाणार नाही, याकडे लक्ष दिले जावे. प्रसंगी दंडात्मक कारवाईदेखील करावी, अशी सूचना देण्यात आल्या,' असे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले. पुणे कटक मंडळाच्या हद्दीत असलेल्या प्रकल्पांमध्ये उघड्यावर कचरा टाकला जातो. त्यामुळे कचरा व्यवस्थापनाचे नियोजन करण्यासाठी २१ जुलैला कटक मंडळाचे अधिकारी आणि महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेतली जाणार आहे. शहरातील अनेक भागांत नागरिक पैसे देत नसल्याने कचरा गोळा करण्याचे काम करणारे स्वच्छ संस्थेचे कर्मचारी कचरा घेत नसल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत. परंतु, नियमानुसार स्वच्छ संस्थेला कोणाचाही कचरा नाकारण्याचा अधिकार नाही. स्वच्छ संस्थेचे कर्मचारी ज्या भागात कचरा गोळा करतात, तेथे उकिरडे तसेच रस्त्यांवर कचरा टाकण्याचे प्रकार आढळून आल्यास त्यांचे तेथील काम काढून घेतले जाईल.अशी चर्चा झाल्याचे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.तेथे पक्ष्यांचा वावर वाढत असून या पक्ष्यांचा त्रास विमान उड्डाणावेळी आणि उतरवताना होतो.

### सात दिवसांत तेथे स्वच्छता करावी

या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शनिवारी या जागांची पाहणी करून तेथे स्वच्छतेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे अनिरुद्ध पावसकर, उपायुक्त माधव जगताप, संदीप कदम, प्रशांत ठोंबरे तसेच विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही याबाबत नुकतीच बैठक घेऊन सूचना केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर, ही पाहणी करण्यात आली.विमानतळ परिसरातील मोकळ्या जागांवर कचरा पडलेला असतो. त्या जागा मालकांना नोटीस देऊन सात दिवसांत तेथे स्वच्छता करावी.

# भटक्या श्वानांचा बंदोबस्त करा : उपमुख्यमंत्री!

## अजित पवार यांची न.प.ला सूचना; विकासकामांची पाहणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात भटकी जनावरे, श्वानांचा वावर, तसेच त्याबाबत नागरिकांच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घेऊन नगर परिषदेने बंदोबस्त करावा. त्यासाठी शहरातील विविध भागांत कोंडवाड्याकरिता जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत,' असे निर्देश उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी शनिवारी येथे दिले.**



बारामती परिसरातील श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर, दशक्रिया घाट, शारदा प्रांगण येथील सुरू असलेली विविध विकासकामे, प्रस्तावित माळावरची देवी ते जळोची चौक चारपदरी रस्ता, जळोची कॅनॉल पुलावरून संभाजीनगरकडे जाणारा रस्ता, कॅनॉललगतची उद्यानाची जागा, जळोची ओढ्याशेजारील दशक्रिया घाट, दहनभूमी, दफनभूमी जागा, रुई हद्दीतील विद्या प्रतिष्ठानाशेजारील दोन लहान पूल, उद्यान, स्मशानभूमी, पूर संरक्षण भिंतीच्या प्रस्तावित जागेची अजित पवार यांनी पाहणी केली. विविध विकास कामांसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतल्यानंतर त्यांनी हे निर्देश दिले.पवार म्हणाले, 'बारामती परिसरातील हद्दवाढ लक्षात घेता प्रस्तावित जागेवर कामे सुरू करावीत. कामात अडथळा आणणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई करावी. या परिसरातील रुई-जळोची ओढा रुंदीकरणाची कामे करताना मोजणी करून त्यामध्ये अतिक्रमण असल्यास ते काढावे. या ओढ्याच्या दोन्ही बाजूंस पूर संरक्षक भिंतीचे बांधकाम करावे.''शारदा प्रांगण परिसरात उभारण्यात येणाऱ्या सीबीएसई आणि मराठी शाळेत विद्यार्थी व शिक्षकांना लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करून इमारत व परिसर विकसित करा. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांच्या सोयी-सुविधांचा विचार करून शौचालय, पाणी, विद्युतव्यवस्था ही कामे करावीत. बाबूजी नाईक वाडा, दशक्रिया घाट परिसरात सावली देणारी झाडे लावावीत. दशक्रिया घाट परिसरामध्ये अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा मिळतील, या दृष्टीने नियोजन करून कामे करावीत. पाणी साचणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. कविवर्य मोरोपंत यांच्या स्मारकाची आवश्यक ती डागडुजी करून घ्यावी,' अशा सूचनाही पवार यांनी केल्या.'बारामती परिसरात विविध विकासकामे सुरू असून, आगामी काळात होणाऱ्या हद्दवाढीचा विचार करून पुढची शंभर वर्षे उपयोगात येईल, तसेच कामे करताना ती देखभालविरहित झाली पाहिजेत, या दृष्टीने नियोजन करून कामे करा,' असे निर्देश पवार यांनी दिले.

### स्वच्छतेकरिता टार पीकिंग मशिन

आदर पूनावाला स्वच्छ शहर उपक्रमांतर्गत स्वच्छतेकरिता टार ग्लूटन लीट्टर पीकिंग मशिन देण्यात आल्या आहेत. पवार यांच्या उपस्थितीत नगर परिषदेच्या सेवेत त्या दाखल करून घेण्यात आल्या. शहरात भटकी जनावरे, श्वानांचा वावर,भागांत कोंडवाड्याकरिता जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत,' असे निर्देश उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी शनिवारी येथे दिले.

### पिंपरी चिंचवड महापालिकेकडून अग्निशामक दलाला सक्षम करण्याचा प्रयत्न

# पिंपरी चिंचवडचे अग्निशामक दल होणार राज्यात अव्वल!

## अग्निशामक दलाला आपत्ती व्यवस्थापन आणि बचाव कौशल्यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी चिंचवड: पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने विभागातील यंत्रसामग्री, उपकरणे आणि वाहनांची कार्यक्षमता तपासण्यासाठी तसेच नव्याने नियुक्त अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास सक्षम करण्यासाठी विशेष उजळणी आणि प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले.**





या प्रशिक्षण सत्रात अग्निशमन सेवेत नुकतेच सरळसेवेने नियुक्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी तसेच कार्यरत अनुभवी कर्मचारी सहभागी झाले होते. यामध्ये अग्निशमन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, घटनास्थळी त्वरीत कृती, तांत्रिक कौशल्ये, आणि विविध उपकरणांच्या वापराबाबत सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

सत्रात रनिंग, पी.टी., स्कॉट ड्रिल, बचाव उपकरणे, रोप रॅपलिंग, न्यूमॅटिक एअर लिफ्टिंग बॅग, हायड्रॉलिक उपकरणे, आस्का लाइट, बीए सेट आणि बीए व्हॅन, तसेच अंडर वॉटर कॅमेरा, बोटिंग, लिफ्ट रेस्क्यू, ईव्ही फायर, क्लोरीन गळती रेस्क्यू, गॅस डिटेक्टर, सीपीआर, हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म, फोम टेंडर इत्यादींचा वापर प्रत्यक्ष सरावाद्वारे शिकवण्यात आला. याशिवाय शहराची टोपोग्राफी, हॉस्पिटल आणि मॉल व्हिजिट, फायर सप्रेशन सिस्टम, फायर पंप आणि विविध ड्रिल्सही सत्राचा भाग होते.

ही उजळणी मोहीम उप अग्निशमन अधिकारी विकास नाईक आणि रुपेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. याच पद्धतीने इतर उपकेंद्रांमध्येही अशा प्रकारचे सत्रे राबवण्याचा विभागाचा मानस असून, विभागाची १०० टक्के कार्यक्षमता साधण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

> महापालिकेच्या अग्निशमन विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची सतत क्षमता वृद्धिंगत होण्यासाठी अशा प्रशिक्षण सत्रांची नितांत गरज आहे. आधुनिक उपकरणांचा योग्य वापर आणि तांत्रिक कौशल्ये हीच आजच्या काळात प्रभावी बचावाची गुरुकिल्ली ठरते. विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी या सत्रात उत्तम सहभाग नोंदवला, ही समाधानाची बाब आहे.
> **- उमेश ढाकणे,** सहाय्यक आयुक्त, अग्निशमन

> हे प्रशिक्षण आमच्यासाठी खूप उपयोगी ठरले. थेट सरावामुळे आत्मविश्वास वाढला. आपत्कालीन प्रसंगी योग्य पद्धतीने काम करण्यासाठी हे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे.
> **- प्रथमेश भोसले,** अग्निशमन कर्मचारी

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रमाला प्रतिसाद!

## आमदार शंकर जगताप यांनी केले 485 नागरिकांच्या तक्रारींचे 'ऑन द स्पॉट' निराकरण

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी चिंचवड : चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकाराने 'आमदार आपल्या दारी' या जनसंपर्क उपक्रमांतर्गत वाकड परिसरातील नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला. हॉटेल बर्ड व्हॅली येथे झालेल्या या कार्यक्रमात ४८५ नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या, त्यावर आमदार शंकर जगताप यांनी जागेवरच निर्णय घेत अधिकाऱ्यांना तातडीच्या कार्यवाहीच्या स्पष्ट सूचना दिल्या.**




या बैठकीत महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी सेवा रस्त्यांचे काँक्रीटीकरण, मेट्रो स्टेशनजवळ पार्किंग सुविधा, वाकड सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा, सांडपाणी व्यवस्थापन व नदी-नाल्यांचे नैसर्गिक प्रवाह सुरळीत ठेवण्याच्या उपाययोजना, दत्त मंदिर रस्त्यासह प्रभागातीलआठवडे बाजार बंद करणे, अतिक्रमणमुक्त फूटपाथ व तसेच संपूर्ण वाकड परिसरातील सर्व रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण यावर चर्चा झाली.

अंडरपास परिसरात 'पुश बॅक' तंत्राचा वापर करून वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्याची योजना असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. विजेच्या तक्रारींसाठी तातडीने केबल बदलण्याचे आदेश देण्यात आले, तर पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी ड्रेनेज सिस्टीमच्या सुधारणा अधिकाऱ्यांना संयुक्त पाहणी करून तत्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले.

एनएचएआय, पीएमआरडीए आणि सर्व संबंधित शासकीय विभागांमध्ये समन्वय यंत्रणा विकसित करण्यात आली असून विधानसभेच्या अधिवेशनात या सर्व कामांना गती देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केले. या उपक्रमात वाकड व पिंपळे निलख परिसरातील दफनभूमी आरक्षण रद्द करण्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, आमदार शंकर जगताप यांनी आरक्षण रद्द करण्याची हमी दिली.

सार्वजनिक सुरक्षेसाठी पोलिसांना गस्त वाढविण्याचे आदेश देण्यात आले. वाकडकर वस्ती ते भुजबळ रस्ता रुंदीकरण, वाहतूक कोंडी, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, अतिक्रमणमुक्त पादचारी मार्ग, सोसायट्यांचे कन्व्हेयन्स डीड, गृह रचना संस्थांना आमदार निधीतून अनुदान, वीज, पाणी, फुटपाथ या समस्या मांडण्यात आल्या.

वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून वाहतूक नियंत्रक दिवे बसवण्याचा प्रस्ताव, वाकड परिसरातील आठवडे बाजारांची पुनर्रचना व नियमन, सहकारी गृह रचना संस्थांमधील कचऱ्याच्या समस्यांवर तातडीने उपाय, आरोग्य व घनकचरा अधिकाऱ्यांना कडक शब्दांत सूचना देत कचरामुक्त प्रभागाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले.

या वेळी तहसीलदार जयराज देशमुख, अन्नधान्य विभागाचे क्षीरसागर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता घंटे, स्थापत्य विभागाचे सुनील शिंदे, वाकड पोलीस ठाण्याचे अर्जुन पवार, वाहतूक विभागाचे निरीक्षक पिंजण, बीआरटीएसचे चंद्रकांत मोरे, महावितरणचे गिरी, विद्युत विभागाचे नागरे, ड्रेनेजचे विनय ओव्हाळ, उपअभियंता अमित दीक्षित, तलाठी चांदेकर यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाला संदीप कस्पटे, आरती चोंधे, विनायक गायकवाड, संकेत चोंधे, संतोष कलाटे, भारती विनोदे, विशाल कलाटे, राम वाकडकर, सचिन साठे, कुणाल वाव्हळकर, राहुल काटे, नितीन इंगवले, स्नेहा कलाटे, श्री कलाटे, गणेश कस्पटे, अमोल कलाटे, रामदास कस्पटे, रणजीत कलाटे, नवनाथ ढवळे, चेतन भुजबळ, नंदू बालवडकर, जालिंदर काटे, सुरेश राजे, तेजस्विनी डोमसे यांच्यासह अनेक आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> नागरिकांच्या दारापर्यंत सेवा पोहोचवणे, थेट संवादातून त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि समस्यांचे त्वरित निराकरण करणे हेच आमचे ध्येय आहे. वाहतूक, वीज, पाणी, ड्रेनेज, सार्वजनिक आरक्षणे, कचरा व्यवस्थापन आणि रोजगार यांसारख्या विविध विषयांवर ठोस निर्णय घेतले आहेत. 'पुश बॅक' तंत्र, सब स्टेशन, सुधारित ड्रेनेज आणि शासकीय यंत्रणांतील समन्वयाच्या जोरावर वाकड–पुनावळे परिसराचा सर्वांगीण विकास होईल, असा मला विश्वास आहे."
> **-शंकर जगताप,** आमदार

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



'स्टेट'मेंन्ट

राहुल जगताप

### साक्षित्वाने राहाणाऱ्याला दुःखाची बाधा नाही.

देहबुद्धी आहे तोवर, म्हणजे 'मी देही आहे' ही भावना आहे तोपर्यंत, काळजी राहाणारच. काळजी मनातून असते. जोवर संशय फिटत नाही, परमेश्वराचा आधार वाटत नाही, तोवर काळजीही मनाला सोडीत नाही. कुंडलीतल्या ग्रहांच्या अधिकाराची मर्यादा देहापर्यंतच आहे. पैसा किती मिळेल हे त्यावरून सांगता येईल, भगवंताकडे किती कल आहे हे सांगता येईल, पण भगवंताची प्राप्ती होईल की नाही हे सांगता येणार नाही. मनुष्यजन्म येऊनही भगवंताची प्राप्ती झाली नाही, तर जिवाचे फार नुकसान आहे. भगवंताच्या प्राप्तीची मनापासून तळमळ लागायला पाहिजे. एकदा का अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो, आणि कोणी संत भेटला की निवांत होतो. संत आपल्यावर येणारी संकटे नाहीशी करीत नाहीत, तर त्या संकटांची भीती नाहीशी करतात. संकटापेक्षा संकटाची भीतीच आपल्याला फार घाबरवून सोडते. 'आपल्याला जे कळले ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या,' हा संतांचा एकच हेतू असतो. संत विषयावर मालकी गाजवितात. जगाला जिंकणे एक वेळ सोपे, पण स्वत:ला जिंकणे कठीण आहे. संत स्वत:ला जिंकून जगात वावरत असतात. संत साक्षित्वाने जगात राहतात, आणि साक्षित्वाने राहणाऱ्याला दु:खाची बाधा होत नाही. संतांच्या संगतीत राहून, त्यांच्या आज्ञेत राहून, आपण आपल्या मनातले सर्व संशय नाहीसे करावेत. वास्तविक, संतांच्या आज्ञेचे एकनिष्ठपणाने जो पालन करतो, त्याचे संशय आपोआप दूर होतात. जोवर संशय आहे तोवर असमाधान आहे. समाधान हे आपले आपल्यालाच घ्यायचे असते. म्हणून, ज्याला समाधानी राहायचे आहे, त्याने फार धडपड करू नये; जशी स्थिती येईल त्या स्थितीत समाधानात राहावे.

कचेरीचे विचार आपल्याबरोबर घरी आणू नयेत; ते तिथेच ठेवावेत. घरातले वातावरण शुद्ध आणि नि:संशयाचे असावे. भोळेपण एकप्रकारे चांगले; ती भाग्याची गोष्ट आहे. जो योगभ्रष्ट असतो त्याच्या अंगी भोळेपण असते; जसे कल्याणस्वामींच्या अंगी होते. झालेल्या गोष्टी विसरून जाण्यातच खरा आनंद आहे; पण ते विसरणे कृत्रिमपणे न आणता, भगवंताच्या स्मरणात राहिल्याने आले पाहिजे. म्हातारपणी मन आणि शरीर फार नाजूक बनते. त्या वेळी शरीरसुद्धा बरे राहायला, आनंद हे फार मोठे औषध आहे. हसावे, खेळावे, लहान मुलांत मिसळावे, थट्टा-विनोद करावा; काहीही करावे, पण आनंदात राहावे. ज्याचा आनंद कायम टिकला, त्याच्याच जन्माचे सार्थक झाले.

बोधवचन:- समाधान ही परमेश्वराची देणगी आहे. ती मिळविण्याचा उपाय म्हणजे भगवंताचे स्मरण होय.

# जित्याची खोड, गोपीला नाही जोड, राजकारणाचा नकोसा हिंसक मोड!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**दोनच दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या लॉबीमध्ये संपूर्ण जनतेने नको, नको तो तमाशा पाहिला. शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भारतीय जनता पार्टीचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये तेथे प्रचंड हमरीतुमरी झाली आणि शिवीगाळ करत तुंबळ हाणामारीही झाली. हा राडा एवढा प्रचंड होता, की त्याची दखल परदेशात सुद्धा घेतली गेली. आता मुख्य मुद्दा असा आहे, की विधिमंडळाच्या दरवाज्यात किंवा लॉबीमध्ये जर अशा प्रकारची हाणामारी होत असेल, तर सभागृहात एकमेकांना गोळ्या घालण्याचा प्रसंग लवकरच येणार, असे वाटायला लागते.**



### अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे..

विधानसभेत जो प्रमुख असतो म्हणजे अध्यक्ष असतो, त्याच्यावर धावून जाण्याचे प्रकार देखील गेल्याच आठवड्यात पाहण्यात आले. मग सांगा, गोळीबार करून समोरच्याला ठार मारले गेले, तर त्यात आश्चर्य काय? हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे लॉबीमध्ये घडलेला तो अभूतपूर्व पण नकोसा प्रसंग ! त्यानंतर मुख्यमंत्री चिडले, अध्यक्षांनी झापले, संबंधितांनी माफी मागितली..ही झाली मलम पट्टी..पण, मूळ ही घटना आहे, तिची जखम एवढी खोलवर आहे, की ती भरून येणे शक्य नाही, हे येथे लक्षात घ्यायला हवे !

### नीतिमत्ता, विधिमंडळाच्या प्रतिमेचे धिंडवडे

जनतेने या आमदारांना का निवडून दिले असावे, असा प्रश्न साहजिकच पडण्याची वेळ आली आहे. नीतिमत्ता वगैरे शब्दांना त्यांनी केव्हाच काळे फासले आहे आणि विधिमंडळाची प्रतिमा डागाळली, असे म्हणणे सुद्धा या प्रकारापुढे अत्यंत फिके आहे. शेवटी त्यातील एक समाधानाची बाब म्हणजे हे प्रकरण विधानसभा विशेषाधिकार समितीकडे सोपवण्यात आले आहे आणि त्यांच्या विरोधात फौजदारी कारवाई सुरू आहे. त्यापूर्वी, या दोघांनाही सभागृहात आणले गेले आणि दोघांनी खेद व्यक्त करावा, तसेच पुन्हा अशी घटना घडणार नाही, असे आश्वस्त करावे, असे विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सुनावले, ती गोष्ट ही त्यांच्यासाठी लाजीरवाणी वाटली नाही.

### निलंबनाची कारवाई अपेक्षित होती..

वास्तविक, या दोन्ही आमदारांना जबाबदारीची जाणीव नव्हती आणि कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळल्यामुळे त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटण्यासारखेही काही नव्हते, त्यामुळे दोघांना निलंबित केले जाईल, अशी सर्वांची इच्छा होती. पण, दोघांनाही सुधारण्याची एक संधी मिळाली, असेच म्हणावे लागेल. त्यासाठीच विधानसभेच्या अध्यक्षांनी हा निकाल दिला असून सध्या प्रकरण तात्पुरते का होईना मिटले आहे.पण, असे प्रसंग किंवा प्रकरण लोकशाही आणि विधिमंडळाच्या प्रतिमेला लाज आणणारे आहे, हे सांगण्याची मुळीच गरज नाही !

### पडळकर यांची तातडीने माफी..

हे सर्व प्रकरण अंगलट येत आहे, असे समजतात पडळकर यांनी मात्र तातडीने माफी मागून टाकली आणि वरिष्ठ तसेच न्यायालय जो निकाल देईल, तो मान्य असेल, असे जाहीर करून टाकले. तथापि, त्यांच्या समर्थकांनी जी कृती केली ती अतिशय चूक आहे. यात अजिबात शंका नाही. दुसरीकडे या हाणामारीच्या प्रसंगाला आव्हाड हे देखील तेवढेच जबाबदार आहेत, हे सुद्धा नाकारून चालणार नाही.

### मंगळसूत्र चोर म्हणून डिवचले..

ही घृणास्पद घटना घडण्यापूर्वी आव्हाड यांनी पडळकर यांना उगीचच उचकवण्याचा का प्रयत्न केला, हे पण समजू शकत नाही. घटनेपूर्वी एक दिवस याच लॉबीमध्ये आव्हाड यांनी मंगळसूत्र चोराच्या नावाने घोषणा देऊन पडळकर यांना डिवचले होते. त्या घोषणा देण्याचे कारण काय, याचा खुलासा त्यांच्याकडे मागितला गेला पाहिजे आणि विधिमंडळाच्या आवारात किंबहुना अधिवेशन सुरू असताना अशा घोषणा देण्याचे कारण काय हे स्पष्ट केले पाहिजे. अर्थात, खऱ्या अर्थाने गुंड असणाऱ्या आव्हाड त्याचा खुलासा देतील अशी किंचितही अपेक्षा वाटत नाही.

### गाडीच्या धक्क्याचे काय प्रकरण..

आता हाणामारीला मी जबाबदार नाही, असे पटवून देण्यासाठी नवनवीन कारणे शोधली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पडळकर यांचा गाडीचा धक्का लागला आणि बाचाबाची होऊन अखेरीस मारामारी झाली, हा आव्हाड यांनी नवा अध्याय सुरू केला आहे. त्यापूर्वी पडळकर यांच्या दिशेने केलेले हातवारे आणि मारलेले डायलॉग काय होते याचा सोक्षमोक्षही बावला पाहिजे.

### माजलेले लोकप्रतिनिधी काय कामाचे?

सर्वसाधारणपणे सध्या सर्वच लोकप्रतिनिधींबद्दल जनतेचे मत फारसे चांगले नाही. त्यातच शिवराळ भाषा, गुंड मवाल्यासारखे वर्तन, सुसंस्कृतपणाचा लवलेशही नसल्यासारखा वावर असे हे लोकप्रतिनिधी आहेत का गल्लीतले गुंड आहेत असा संभ्रम निर्माण होतो. आव्हाड ज्या वेळेला कायदा-सुव्यवस्था, नियमांची भाषा करतात तेव्हा आपला भूतकाळ विसरला का, हा प्रश्न त्यांना विचारला जातो. करमूसे यांना केलेली मारहाण, ते विसरतात.. प्रतिक्रिया व्यक्त करताना वापरलेली अगदी खालच्या थराची भाषा विसरतात..या अधिवेशनात अगदी अतुल भातखळकर यांच्यापासून अनेकांनी त्यांचा अभ्यास किती अपूर्ण आहे, हे दाखवून दिल्याचे विसरतात. एक वेळ जयंत पाटील यांना भाजप, राष्ट्रवादी पक्ष सामील करून घेतील. मात्र आव्हाड यांना इतर कोणत्याही पक्षात जागा मिळेल असे वाटत नाही..

### आव्हाडांना सोयर सुतक नाही..

आता या मुद्द्यावर आव्हाड म्हणतील, की मला कुठेही जायचे नाही. पण, आपल्या अस्तित्वाची अखेरची धडपड त्यांनी सुरू केली आहे, येण केण प्रकारेण प्रसिद्धी मिळवायची, हे त्यांचे तंत्र सर्वपरिचित आहे. मात्र त्यासाठी त्यांनी अजून अभ्यास करावा. संजय राऊत, रोहित पवार, सुषमा अंधारे संजय गायकवाड, राणे बंधू यांच्या पंक्तिपेक्षा खालच्या जागेवर ते वाटचाल करीत आहेत. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. ही म्हण सिद्ध करण्याच्या भानगडीत त्यांनी पडू नये. मुळामध्ये या मंडळींना जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी पाठवले आहे, ते त्यांनी सोडवावेत,बाकी ठिकाणी लक्ष घालण्याची किंवा नाक खुपसण्याची काय गरज आहे?

### रात्री-अपरात्री दंगा आणि नाटक..

जितेंद्र आव्हाड यांच्याकडून दंग्याची अपेक्षा असते. पण, रात्री अपरात्री दंगा करायचा, वाटेल तसे तुसडेपणाने बोलायचे आणि कोणत्याही अभ्यासाशिवाय, पुराव्याशिवाय वटवट करायची, हे प्रथम त्यांनी थांबवायला हवे. त्या दिवशी रात्री रोहित पवार हे देखील त्यांच्या मदतीला धावले. पण, ज्या प्रकारे पोलीस अधिकाऱ्यांना ते बोलत होते, ते मुळीच सुसंस्कृतपणाचे नव्हते. बहुतेक मंडळींना निवडून काय यायचे असते, याची माहिती नाही. सत्ता मिळवायची..त्यातून पैसे काढायचे आणि पैशाच्या रूपाने पुन्हा निवडून येऊन सत्तेत बसायचे, एवढेच संस्कार झालेल्या या मंडळींनी वर्तनशास्त्राचा किमान अभ्यास करावा. आत्ताच्या नेत्यांच्या बाप मंडळींनी जे पेरले आहे, ते उगवत आहे. आता नव्याने चांगली पेरणी या मंडळींनी करावी तरच राजकारणाचे भवितव्य आशादायक दिसेल..

### आता जनतेनेच विचार करावा..

अशा गुंड, मवाल्यांना निवडून देणाऱ्या मतदारांनीच आता सूज्ञपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. नीतीमत्तेची लक्तरे वेशीवर टांगणारे हे नालायक प्रतिनिधी पुन्हा सभागृहात येऊच नयेत, अशी तरतूद त्यांचे राजकीय पक्ष करणार नाहीत, पण मतदार करू शकतात, हे आता ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मैदान तुमचं, वेळ तुमची, कुठं येऊ सांगा?

## मनसे नेत्याचं खासदार निशिकांत दुबेंना खुलं आव्हान





। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात हिंदी भाषा आणि मराठी विरुद्ध अमराठी अशा मुद्यांवरून राजकारण तापलं आहे. काही दिवसांपूर्वी मिरा भाईंदरमध्ये झालेल्या मराठी विरुद्ध अमराठी मुद्यांवरून व्यापाऱ्यांच्या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी मनसेच्या कार्यकर्त्यांनी अमराठी व्यापाऱ्यांच्या विरोधात मोर्चा काढला होता. त्यानंतर शुक्रवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा मिरा भाईंदरमध्ये पार पडली.**

या सभेत बोलताना राज ठाकरे हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात आणि मराठी विरुद्ध अमराठी या मुद्यांवरून चांगलेच आक्रमक झाले होते. यावेळी राज ठाके यांनी भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिलं. 'दुबे... तुम मुंबई में आ जावो...मुंबई के समंदर में डुबे डुबे कर मारेंगे' असं राज ठाकरे यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर खासदार निशिकांत दुबे यांनी पुन्हा एक्सवर पोस्ट करत राज ठाकरेंना मीच हिंदी शिकवली, असं म्हणत मनसेला डिवचलं. दरम्यान, यानंतर आता मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी खासदार निशिकांत दुबे यांना खुलं आव्हान दिलं आहे. 'दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळ तुमची, कुठं येऊ सांगा?'राज ठाकरेंना तुम्ही काय हिंदी शिकवता? राज ठाकरेंच्या वडिलांनी मोहम्मद रफी यांच्याकडून मराठीत गाणे म्हणून घेतलेत. त्यामळे तुम्ही आम्हाला भाषा शिकवू नका. निशिकांत दुबेंपेक्षा राज ठाकरे यांची हिंदी कधीही चांगली आहे. आमचा भाषेला कधीही विरोध नाही आणि आम्ही कधीही भाषेला विरोध आहे असं म्हणत नाहीत", असं प्रकाश महाजन यांनी म्हटलं. तसेच इशारा देताना प्रकाश महाजन म्हणाले की, "निशिकांत दुबे यांना मी सांगतो की दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळही तुमची, कुठे येऊ हे फक्त सांगा. मग कोण कोणाला पटक पटक मारतं ते पाहू", असा इशारा प्रकाश महाजन यांनी दिला आहे.मी राज ठाकरेंना हिंदी शिकवली", अशा शब्दांत भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना प्रत्युत्तर दिलं आहे. शुक्रवारी मीरा भायंदर इथे झालेल्या सभेत राज ठाकरे यांनी दुबे यांच्या पटक पटक के मारेंगे या वक्तव्याचा समाचार घेतला होता. त्यावर दुबे यांनी 'एक्स' च्या माध्यमातून ही प्रतिक्रिया दिली.माज घेऊन कोणी अंगावर आला तर त्याला ठेचायचा. भाजपाचा कोणीतरी खासदार दुबे नावाचा. काहीतरी बोलला. झाली का त्याच्यावर केस? हिंदी चॅनलने चालवलं का नाही? तू आम्हाला पटक पटक के मारणार? दुबे- तुम मुंबई में आ जाओ. मुंबई के समुंदर में डुबे डुबे कर मारेंगे असा इशारा राज यांनी शुक्रवारी दिला होता.या सभेत बोलताना राज ठाकरे हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात आणि मराठी विरुद्ध अमराठी या मुद्यांवरून चांगलेच आक्रमक झाले होते. यावेळी राज ठाके यांनी भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिलं.त्यांच्या या विधानानंतर खासदार निशिकांत दुबे यांनी पुन्हा एक्सवर पोस्ट करत राज ठाकरेंना मीच हिंदी शिकवली, असं म्हणत मनसेला डिवचलं.

### मी राज ठाकरेंना हिंदी शिकवली

दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळ तुमची, कुठं येऊ सांगा?'राज ठाकरेंना तुम्ही काय हिंदी शिकवता? राज ठाकरेंच्या वडिलांनी मोहम्मद रफी यांच्याकडून मराठीत गाणे म्हणून घेतलेत. त्यामळे तुम्ही आम्हाला भाषा शिकवू नका. निशिकांत दुबेंपेक्षा राज ठाकरे यांची हिंदी कधीही चांगली आहे. आमचा भाषेला कधीही विरोध नाही आणि आम्ही कधीही भाषेला विरोध आहे असं म्हणत नाहीत", असं प्रकाश महाजन यांनी म्हटलं. तसेच इशारा देताना प्रकाश महाजन म्हणाले की, "निशिकांत दुबे यांना मी सांगतो की दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळही तुमची, कुठे येऊ हे फक्त सांगा. मग कोण कोणाला पटक पटक मारतं ते पाहू", असा इशारा प्रकाश महाजन यांनी दिला आहे. मी राज ठाकरेंना हिंदी शिकवली", अशा शब्दांत भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

---

# लॉबीतील मारहाणीच्या घटनेला जबाबदार कोण?

## विधानभवनाच्या मारहाणीच्या घटनेला फडणवीस हेच जबाबदार





। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानभवन परिसरात हाणामारीची एक घटना घडली आणि त्या घटनेवरून राज्याचं राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळालं. भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारीची घटना घडली. या घटनेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मात्र, त्यानंतर या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांचे समर्थक आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकाला पोलिसांनी अटक केलं.**

दरम्यान, या प्रकरणावर बोलताना आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गंभीर आरोप केला आहे. विधानभवनाच्या लॉबीत झालेल्या मारहाणीच्या घटनेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार असल्याचा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच सध्या राज्यात चर्चेत असलेल्या हनीट्रॅपच्या विषयावरूनही सपकाळ यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.आजपर्यंत कोणत्याही अधिवेशनादरम्यान अशा प्रकारची हाणामारीची घटना घडली नाही. हे अधिवेशन कशासाठी गाजलं? शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गाजलं का? भाषेच्या प्रश्नांसाठी गाजलं का? राज्याच्या विकासाठी हे अधिवेशन गाजलं का? तर नाही. हे अधिवेशन गाजलं ते हाणामारीच्या घटनेने. कोणी बुक्के मारतो, तर कोणी चापटा मारतो, तर कोणी शिव्या काय देतात? एवढंच नाही तर सभागृहाच्या बाहेरही म्हणजे अक्कोलकोटमध्ये प्रविण गायकवाड यांच्यावर हल्ला झाला. त्या हल्लेखोराला भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष फोन करून सांगतात की भिऊ नको मी तुमच्या पाठिशी आहे", असं म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर टीका केली.

### हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले?

"विधानभनाच्या लॉबीत हाणामारीची घटना घडते? मग या घटनेवरून आता मुख्यमंत्र्यांचं अभिनंदन करायचं का? या अशा घटनांना जबाबदार कोण? हे प्रकरणे आता हाताबाहेर चालले आहेत. विधानभनाच्या लॉबीतील हाणामारीच्या घटनेला थेट जबाबदार कोण असेल? तर या घटनेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार आहेत", असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी आज माध्यमांशी बोलताना केला आहे.भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारीची घटना घडली होती. या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांचे समर्थक आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकाला पोलिसांनी अटक केलं होतं. या अटकेनंतर दोन्ही कार्यकर्त्यांना किल्ला न्यायालयात हजर करण्यात आलं.ऋषिकेश ऊर्फ सर्जेराव टकले आणि नितीन देशमुख या दोघांनाही तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# 5 लढाऊ विमानांबद्दल सत्य काय आहे?

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्यानंतर राहुल गांधींचा सवाल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलं होतं. भारत-पाकिस्तान संघर्षाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याआधीही अनेकदा विधाने केलेले आहेत. मात्र, आज डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान संघर्षासंदर्भात एक मोठा दावा केला. 'भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान ५ लढाऊ विमाने पाडण्यात आले', असं ट्रम्प यांनी म्हटलं. त्यांच्या या दाव्यानंतर चर्चांना उधाण आलं.**



डोनाल्ड ट्रम्प यांच्या या दाव्यानंतर आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल विचारला आहे. ५ लढाऊ विमानांबद्दल नेमकं सत्य काय आहे? असा सवाल राहुल गांधी यांनी केला आहे. या संदर्भात राहुल गांधी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याच्या व्हिडीओ एक्सवर (ट्विटर) शेअर केला आणि विचारलं की, "मोदीजी, ५ विमानांबद्दल सत्य काय आहे? देशाला जाणून घेण्याचा अधिकार आहे", असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वपूर्ण विधान केलं. भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान पाच विमाने पाडण्यात आली. मे महिन्यात झालेल्या शस्त्रविरामानंतर परिस्थिती शांत झाली असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. व्हाईट हाऊसमधील काही रिपब्लिकन खासदारांसोबतच्या भोजनादरम्यान ट्रम्प यांनी हे विधान केलं.दरम्यान, हे पाडली गेलेली विमानं भारताची होती की पाकिस्तानची हे मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले नाही.

ट्रम्प यांनी पुन्हा एकदा असा दावा केला की त्यांनी व्यापाराच्या नावाखाली दोन्ही अण्वस्त्रधारी देशांमधील शस्त्रविराम घडवून आणला होता. दोन देशांमधील युद्धासारख्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांच्या प्रशासनाच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विधान केले. "खरं तर विमानांवर हवेतून गोळीबार केला जात होता. मला वाटतं प्रत्यक्षात पाच विमानं पाडण्यात आली", असे ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान युद्धाबाबत बोलताना सांगितले. मात्र याबाबत त्यांनी सविस्तर कोणतीही माहिती दिलेली नाही.वॉशिंग्टनने दोन्ही देशांशी चर्चा केल्यानंतर १० मे रोजी सोशल मीडियावर जाहीर केलेल्या भारत-पाकिस्तानमधील शस्त्रविरामाचे श्रेय डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार स्वतःकडे घेतले. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान शस्त्रविराम करारासाठी व्यापार कराराला जबाबदार धरले, हा दावा भारताने मात्र फेटाळून लावला. नवी दिल्ली आणि इस्लामाबादने त्यांच्यातील समस्या थेट आणि कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय सोडवल्या पाहिजेत अशी भारताची भूमिका आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या दाव्यानंतर आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल विचारला आहे. ५ लढाऊ विमानांबद्दल नेमकं सत्य काय आहे? असा सवाल राहुल गांधी यांनी केला आहे. या संदर्भात राहुल गांधी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याच्या व्हिडीओ एक्सवर (ट्विटर) शेअर केला आणि विचारलं की, "मोदीजी, ५ विमानांबद्दल सत्य काय आहे? देशाला जाणून घेण्याचा अधिकार आहे", असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वपूर्ण विधान केलं.

### प्रत्यक्षात पाच विमानं पाडण्यात आली

भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान पाच विमाने पाडण्यात आली. मे महिन्यात झालेल्या शस्त्रविरामानंतर परिस्थिती शांत झाली असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. व्हाईट हाऊसमधील काही रिपब्लिकन खासदारांसोबतच्या भोजनादरम्यान ट्रम्प यांनी हे विधान केलं.दरम्यान, हे पाडली गेलेली विमानं भारताची होती की पाकिस्तानची हे मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले नाही. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा असा दावा केला की त्यांनी व्यापाराच्या नावाखाली दोन्ही अण्वस्त्रधारी देशांमधील शस्त्रविराम घडवून आणला होता. दोन देशांमधील युद्धासारख्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांच्या प्रशासनाच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विधान केले. "खरं तर विमानांवर हवेतून गोळीबार केला जात होता. मला वाटतं प्रत्यक्षात पाच विमानं पाडण्यात आली.

# संघ प्रणित संस्थेतर्फे केरळमध्ये ज्ञान सभा

## देशभरातील विविध विद्यापीठांचे कुलगुरूचा सहभाग

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गुजरात, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि पुदुचेरी सारख्या राज्यांतील कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणमंत्र्यांसह सुमारे ३०० हून अधिक उच्च शिक्षणतज्ज्ञ केरळच्या कलाडी येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रणित शिक्षा संस्कृती उत्थान न्यासतर्फे आयोजित ज्ञान सभा परिषदेमध्ये सहभागी होणार आहेत. सरसंघचालक मोहन भागवत या ज्ञानसभेला संबोधित करणार आहेत. सरसंघचालक मोहन भागवत चार दिवसांच्या केरळ दौऱ्यावर जाणार आहेत.**



मोहन भागवत यांचा हा दौरा अनेक प्रकारे खास असणार आहे. या दौऱ्यात ते शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक प्रतिष्ठित व्यक्तींबरोबर त्यांच्या गाठीभेटी होणार आहेत.२५ ते २८ जुलै दरम्यान या ज्ञानसभेचे आयोजन करण्यात आले असून 'एज्युकेशन फॉर डेव्हलप इंडिया' या विषयावर ही परिषद केंद्रित असेल. २७ जुलै रोजी सरसंघचालक मोहन भागवत यांचे भाषण हे परिषदेचे प्रमुख आकर्षण असेल. या परिषदेत ते शिक्षणातील भारतीयकरण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० ची अंमलबजावणी आदी विषयांवर चर्चा होणार आहे. गायत्री परिवार, आर्ट ऑफ लिव्हिंग, रामकृष्ण मिशन, चिन्मय मिशन आणि विवेकानंद योग अनुसंधान केंद्र यांसारख्या आघाडीच्या आध्यात्मिक आणि शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधीदेखील या चार दिवसांच्या या कार्यक्रमात सहभागी होतील. शुक्रवारी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी म्हणाले की, भारतातील शिक्षण अधिक भारत केंद्रित आणि ज्ञान केंद्रित कसे होऊ शकते याचा शोध घेणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. ते म्हणाले, "या परिषदेचा उद्देश पाश्चात्य ज्ञान प्रणालींना विरोध करणे नसून भारतीय विद्यार्थी त्यांच्या परंपरा, संस्कृती आणि ज्ञानात रुजलेले राहतील याची खात्री करणे आहे."

### 28 जुलै रोजी सत्राचे आयोजन

परिषदेच्या पहिल्या दोन दिवसांत (२५-२६ जुलै) 'चिंतन बैठक' होईल. या बैठकीत काही निवडक सहभागी अभ्यासक्रमाचे भारतीयीकरण, भारतीय भाषांचे संवर्धन, नैतिक शिक्षण आणि पारंपारिक ज्ञान प्रणाली या मुद्द्यांवर चर्चा करतील. शेवटच्या दिवशी म्हणजेच २८ जुलै रोजी खुल्या सत्राचे आयोजन केले जातील, ज्यात या विषयांवर धोरणात्मक चर्चा होईल. केरळमध्ये न्यासचा इतका मोठा शैक्षणिक कार्यक्रम पहिल्यांदाच आयोजित केला जात आहे. केरळ हे आदि शंकराचार्यांचे गृहराज्य आहे आणि कलाडी हे त्यांचे जन्मस्थान आहे. या ठिकाणाला आध्यात्मिक वारसा लाभला आहे. त्यामुळे या परिषदेसाठी या ठिकाणाची निवडही महत्त्वपूर्ण आहे.शिक्षा संस्कृती उत्थान न्यासची स्थापना २००७ मध्ये करण्यात आली.

# 'कुर्ला टू वेंगुर्ला'मधून एका लग्नाची गोष्ट उलगडणार




कालौघात सर्वच क्षेत्रांत आमूलाग्र बदल झाले आहेत. तंत्रज्ञान, दळणवळण, आर्थिक स्थिती, शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांसह नव्या पिढीच्या आशा-आकांक्षाही बदलल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील युवा पिढीच्या मानसिकतेचा वेध घेत एका लग्नाची रंजक गोष्ट 'कुर्ला टू वेंगुर्ला' या मराठी चित्रपटातून उलगडणार आहे. अभिनेता प्रल्हाद कुडतरकर, वीणा जामकर, वैभव मांगले प्रमुख भूमिकेत असून हा चित्रपट १९ सप्टेंबरला प्रदर्शित होईल. सिने कथा कीर्तन, चंद्रभागा स्टुडिओज आणि ऑरा प्रॉडक्शन्स या निर्मिती संस्थांनी 'कुर्ला टू वेंगुर्ला'ची निर्मिती केली आहे. अमरजित आमले, विजय कलमकर, चारुदत्त सोमण, नयना सोनावणे, अविनाश सोनावणे, एम. व्ही. शरतचंद्र हे या चित्रपटाचे निर्माते आहेत.

# प्रेक्षक चित्रपटगृहांकडे पाठ का फिरवतात?

भारतीय प्रेक्षकांना ओटीटीच्या रूपात मनोरंजनाचा एक नवीन पर्याय मिळाला आहे. नेटफ्लिक्स, प्राइम व्हिडीओ, हॉटस्टार व यूट्यूब यांसारख्या मनोरंजनाच्या वाढत्या पर्यायांमुळे चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांची सतत कमी होत जाणारी गर्दी ही चित्रपट निर्मात्यांसाठी चिंतेचा विषय ठरली आहे. हिंदुस्तान टाइम्सशी झालेल्या संभाषणात, पंकज त्रिपाठी यांनी प्रेक्षकांच्या चित्रपटगृहात न येण्यावर प्रतिक्रिया दिली आहे. अभिनेत्याने सांगितले की, जर तिकिटांच्या किमती कमी केल्या, तर अधिक लोक चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहांमध्ये जातील. चित्रपटगृहांमध्ये चित्रपट पाहण्यासाठी तिकिटांच्या वाढत्या किमती हा चिंतेचा विषय असल्याचे म्हटले गेले आहे.चित्रपटांच्या घटत्या कमाईच्या मुद्द्यावर पंकज त्रिपाठी म्हणाले, "तिकिटांची किंमत ही एक मोठी समस्या आहे आणि त्याचीही भूमिका आहे. जर आज एखाद्या कुटुंबाला चित्रपट पाहण्यासाठी जावे लागले, तर त्याच्यासाठी खूप महागडे प्रकरण बनते. तिकिटांची किंमत आणि तिथे दिले जाणारे जेवण खूप महाग असते." नुकतेच 'मेट्रो इन दिनों' चित्रपटात दिसलेले पंकज त्रिपाठी म्हणाले, "मला आर्थिक दृष्टिकोनातून सिनेमाबद्दल जास्त माहिती नाही. त्यामुळे व्यवसायाचे गणित माझ्या समजण्यापलीकडे आहे. एक कलाकार म्हणून माझे लक्ष फक्त चित्रपटावर आहे. पंकज त्रिपाठी यांना वाटते की, चित्रपटाची तिकिटे खूप महाग झाली आहेत.

# एकाच वेळी खाल्ले होते 40 समोसे

चित्रपटसृष्टीतील बहुतेक अभिनेत्री त्यांच्या फिटनेसची विशेष काळजी घेतात. चित्रपटांमध्ये चांगले दिसण्यासाठी त्यांना त्यांच्या डाएटची चांगली काळजी घ्यावी लागते. बॉलीवूडमधील सर्व अभिनेत्री फिटनेसमध्ये एकमेकांशी स्पर्धा करतात. स्वतःची फिगर राखण्यासाठी या सुंदरी जिममध्ये तासन् तास घाम गाळतात आणि भरपूर डाएटदेखील करतात.पण, बॉलीवूडमध्ये अशी एक अभिनेत्री आहे, जिने एकाच वेळी ४० समोसे खाल्ले होते. पण, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, ती फिटनेसमध्ये मलायका अरोरालाही टक्कर देते. ही दुसरी-तिसरी कोणी नसून बॉलीवूडची स्टाईल आयकॉन सोनम कपूर आहे. ४० समोसे खाल्ल्यानंतरही सोनमच्या फिटनेसचे रहस्य काय आहे? हे रहस्य अभिनेत्रीने स्वतः सांगितले होते.सोनमने अनेकदा सांगितले आहे की, ती तिच्या डाएटची काळजी घेते आणि फिट दिसण्यासाठी जिममध्ये जाते. पण एकदा तिने सांगितले की, तिने ४० समोसे खाल्ले; पण हे कसे शक्य झाले?सोनम कपूर तिच्या 'द झोया फॅक्टर' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी कपिल शर्माच्या शोमध्ये आली होती, त्यादरम्यान तिने एका वेळी ४० समोसे खाल्ल्याचे उघड केले. सोनमने सांगितले की, एक काळ असा होता की, जेव्हा ती स्थूल होती आणि खूप जंक फूड खात असे. ती लहान असताना तिने सुमारे ४० छोटे समोसे खाल्ले होते.शोमध्ये कपिल शर्माने सोनम कपूरला विचारले, "सोनम, तुझ्याबद्दल एक अफवा आहे की, तू एकदा ४० समोसे खाल्लेस." सोनमने हसून उत्तर



# जितेंद्र जोशीची भावुक पोस्ट

जितेंद्र जोशी मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांतून वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. जितेंद्र जोशी त्याच्या व्यावसायिक आयुष्यामुळे बऱ्याचदा चर्चेत असतो. अशातच आता अभिनेत्याने सोशल मीडियावर एक खास पोस्ट केली आहे. ही पोस्ट त्याने त्याच्या खासगी आयुष्यातील एका महत्त्वाच्या व्यक्तीसाठी केली आहे. जितेंद्र जोशीने त्याची लेक रेवाच्या वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. जितेंद्र जोशी सोशल मीडियावर फार मोठ्या पोस्ट लिहिताना दिसत नाही. परंतु, आज लेकीच्या वाढदिवसानिमित्त अभिनेत्याने त्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत. जितेंद्रने त्याची लेक रेवाचे काही फोटोसुद्धा यावेळी शेअर केले आहेत.जितेंद्रने रेवाचे काही फोटो पोस्ट करत त्यांना कॅप्शन देत असे म्हटले, "पहिल्या चित्रफितीमध्ये इच्छा आणि शेवटच्या छायाचित्रात वास्तव आहे; दोन्हींच्या मध्ये काळ एकेका क्षणाचा दिवस, दिवसाचा आठवडा, महिना, वर्ष बनून / बदलून सरताना मनात मात्र काही क्षण रेंगाळत राहतात.

# दिवसात फक्त एक सफरचंद

काहींना बारीक व्हायचं असतं तर काहींना जाड या वजन वाढवण्याच्या आणि कमी करण्याच्या प्रक्रियेमध्ये आपला जीव नकोसा होतो. वाढत्या वजनामुळे आपल्याला अनेकदा ट्रोलही केलं जातं. कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार यांच्याकडून नेहमीच आपल्याला ऐकावे लागते. वजन कमी करणे, ट्रान्स्फॉर्मेशन आणि जिममध्ये तासन् तास घाम गाळणे किंवा स्वतःला फिट ठेवणे हे चित्रपटसृष्टीत प्रत्येक कलाकाराला करावे लागते. कलाकार त्यांचा वजन घटवण्याचा प्रवास नेहमीच आपल्या चाहत्यांबरोबर शेअर करीत असतात. दक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सुंदर अभिनेत्री मालविका मोहनन सध्या तिच्या वजन कमी करण्यामुळे चर्चेत आहे. खरे तर, मालविकाने फक्त १५ दिवसांत आठ किलो वजन कमी केले आणि तिचे वजन मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे ऐकून लोक आश्चर्यचकित झाले आहेत. इतक्या कमी वेळात आठ किलो वजन कमी करणे खूप अस्वास्थ्यकर आणि हानिकारक मानले जाते. दुसरीकडे मालविकाने स्वतः एका मुलाखतीत कबूल केले की, तिने फक्त दोन आठवड्यांत आठ किलो वजन कमी केले आणि त्यासाठी तिने क्रॅश डाएटसारख्या पद्धतींचा अवलंब केला, ज्या डॉक्टर नेहमीच अस्वास्थ्यकर म्हणून वर्णन करतात. तिने एका मुलाखतीत तिचा डाएट प्लॅन सांगितला आहे.मालविका लवकरच प्रभासबरोबर 'द राजा साब' या चित्रपटात दिसणार आहे. मालविका मोहननने मुलाखतीत सांगितले की, ती 'थंगलान' आणि 'बियॉण्ड द क्लाउड्स' या चित्रपटांसाठी शूटिंग करत होती. या चित्रपटांमध्ये तिला खूप बारीक दिसायचे होते. त्याच वेळी 'थंगलान'दरम्यान ते काही स्टंट सीनदेखील करीत होते. ॲक्शन सीन्ससाठी तिला वजन खूप कमी करण्यास सांगण्यात आले होते. त्यामुळे अभिनेत्रीने वजन लवकर कमी करण्यासाठी कठोर आहार आणि व्यायाम यांची मदत घेतली. मालविका म्हणाली की, हा तिच्यासाठी खूप कठीण टप्पा होता. कारण- मी जे काही खात होते, त्यापेक्षा जास्त कॅलरीज बर्न करीत होते. त्यामुळे माझे वजन खूप कमी झाले. मालविका म्हणाली, "एका भूमिकेसाठी त्यांनी मला सांगितले की, मला माझ्या शरीरातील चरबीचे प्रमाण कमी करावे लागेल. म्हणूनच मी लो कार्ब डाएट घेत होते. मी ३ मिल डाएट फॉलो केले. पण, दिवसभरात मी फक्त एक सफरचंद आणि एक अंडे (पांढरा भाग) खात असे.

# मोहम्मद शमीचं पुनरागमन होणार!

## शमी लवकरच क्रिकेटच्या मैदानावर कमबॅक करणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी गेल्या काही महिन्यांपासून भारतीय संघातून बाहेर आहे. दुखापतीतून सावरल्यानंतर त्याने वनडे संघात पुनरागमन केलं, पण कसोटी संघात त्याला अजूनही पुनरागमन करता आलेलं नाही. इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठी त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही. आता शमीला पुनरागमन करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. आगामी होम सीजनसाठी शमीचा बंगालच्या ५० संभावित खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शमी पुन्हा एकदा ॲक्शनमध्ये दिसू शकतो.**




येत्या २८ ऑगस्टपासून दुलीप ट्रॉफी स्पर्धेला सुरूवात होणार आहे. या स्पर्धेत भारतातील एकापेक्षा एक स्टार खेळाडू खेळताना दिसणार आहेत. या स्पर्धेत मोहम्मद शमी ईस्ट झोनकडून खेळताना दिसू शकतो. दुखापतीतून सावरल्यानंतर त्याने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत दमदार पुनरागमन केलं होतं. या स्पर्धेत भारतीय संघाने अंतिम फेरीत न्यूझीलंडला पराभूत करून जेतेपदाचा मान मिळवला होता.या स्पर्धेत शमीने चांगली गोलंदाजी केली होती. स्पर्धेतील ५ सामन्यांमध्ये सर्वाधिक ९ गडी बाद करून तो भारतासाठी सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत संयुक्तरित्या अव्वल स्थानी होता. पण एक गोष्ट टाळता येणार नाही, तो या स्पर्धेतील सर्वात महागडा भारतीय गोलंदाज ठरला होता. त्याने या स्पर्धेत ५.६८ च्या इकॉनॉमिने धावा खर्च केल्या होत्या. त्यामुळे तो आधीसारखी गोलंदाज करत नसल्याचं दिसून आलं होतं. आयसीसी वनडे वर्ल्डकप २०२३ स्पर्धा झाल्यानंतर मोहम्मद शमीला दुखापतीमुळे संघातून बाहेर पडावं लागलं होतं. त्याच्या दुखापतीवर शस्त्रक्रिया करण्यात आली.

बरेच महिने तो संघाबाहेर राहिला. त्यानंतर त्याला २०२५ मध्ये पुनरागमन करण्याची संधी मिळाली. बंगालच्या संघात मोहम्मद शमीसह आकाशदीप, मुकेश कुमार आणि अभिषेक पोरेल या खेळाडूंचा देखील समावेश करण्यात आला आहे. आता देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपली छाप सोडून शमी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.येत्या २८ ऑगस्टपासून दुलीप ट्रॉफी स्पर्धेला सुरूवात होणार आहे. या स्पर्धेत भारतातील एकापेक्षा एक स्टार खेळाडू खेळताना दिसणार आहेत. या स्पर्धेत मोहम्मद शमी ईस्ट झोनकडून खेळताना दिसू शकतो. दुखापतीतून सावरल्यानंतर त्याने

### शमी पुन्हा एकदा ॲक्शनमध्ये

बंगालच्या संघात मोहम्मद शमीसह आकाशदीप, मुकेश कुमार आणि अभिषेक पोरेल या खेळाडूंचा देखील समावेश करण्यात आला आहे. आता देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपली छाप सोडून शमी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. त्यानंतर त्याला २०२५ मध्ये पुनरागमन करण्याची संधी मिळाली.भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी गेल्या काही महिन्यांपासून भारतीय संघातून बाहेर आहे. दुखापतीतून सावरल्यानंतर त्याने वनडे संघात पुनरागमन केलं, पण कसोटी संघात त्याला अजूनही पुनरागमन करता आलेलं नाही. इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठी त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही. आता शमीला पुनरागमन करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. आगामी होम सीजनसाठी शमीचा बंगालच्या ५० संभावित खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शमी पुन्हा एकदा ॲक्शनमध्ये दिसू शकतो.

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत दमदार पुनरागमन केलं होतं. या स्पर्धेत भारतीय संघाने अंतिम फेरीत न्यूझीलंडला पराभूत करून जेतेपदाचा मान मिळवला होता.या स्पर्धेत शमीने चांगली गोलंदाजी केली होती. स्पर्धेतील ५ सामन्यांमध्ये सर्वाधिक ९ गडी बाद करून तो भारतासाठी सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत संयुक्तरित्या अव्वल स्थानी होता.

पण एक गोष्ट टाळता येणार नाही, तो या स्पर्धेतील सर्वात महागडा भारतीय गोलंदाज ठरला होता. त्याने या स्पर्धेत ५.६८ च्या इकॉनॉमिने धावा खर्च केल्या होत्या. त्यामुळे तो आधीसारखी गोलंदाज करत नसल्याचं दिसून आलं होतं.आयसीसी वनडे वर्ल्डकप २०२३ स्पर्धा झाल्यानंतर मोहम्मद शमीला दुखापतीमुळे संघातून बाहेर पडावं लागलं होतं. त्याच्या दुखापतीवर शस्त्रक्रिया करण्यात आली. बरेच महिने तो संघाबाहेर राहिला.

# तर ऋषभने चौथा सामना खेळू नये!

## रवी शास्त्रींचा 'हा' सल्ला टीम इंडियासाठी फायदेशीर ठरू शकतो

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना लॉर्ड्सच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला २२ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यात भारतीय संघाला आणखी एक मोठा धक्का बसला. संघातील उपकर्णधार आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत दुखापतग्रस्त झाला.**






त्यामुळे तो लॉर्ड्स कसोटीत क्षेत्ररक्षण करण्यासाठी मैदानात येऊ शकला नव्हता. त्याच्या जागी ध्रुव जुरेल यष्टीरक्षणासाठी आला. मात्र, ऋषभला फलंदाजीला यावं लागलं. आता चौथ्या कसोटीत त्याच्या खेळण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. ऋषभ खेळणार की नाही? असा प्रश्न उपस्थित होत असताना भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक आणि समालोचक रवी शास्त्री यांनी भारतीय संघाला मोलाचा सल्ला दिला आहे.. तिसऱ्या कसोटीतील पहिल्या डावात फलंदाजी करताना त्याने शानदार अर्धशतकी खेळी केली होती. दुसऱ्या डावात तो स्वस्तात बाद होऊन माघारी परतला होता.

### पंतच्या दुखापतीबाबत अपडेट

या सामन्यात त्याच्या तर्जनीला दुखापत झाली होती. सुरूवातीचे काही षटक यष्टीरक्षण केल्यानंतर त्याला मैदान सोडावं लागलं होतं. त्याच्या अनुपस्थितीत ध्रुव जुरेलने यष्टीरक्षणाची जबाबदारी पार पाडली होती.रवी शास्त्री म्हणाले, "मला तरी हेच वाटतं की, तो जर यष्टीरक्षण करू शकत नसेल तर त्याने फलंदाज म्हणून मैदानात उतरू नये. हे योग्य ठरणार नाही. कारण फक्त फलंदाज म्हणून मैदानात उतरला तर त्याला क्षेत्ररक्षण करावं लागेल. जर तो क्षेत्ररक्षण करणार असेल तर परिस्थिती आणखी बिकट होईल. कारण यष्टीरक्षण करताना हातात ग्लोव्हज असतात. पण क्षेत्ररक्षण करताना कुठलंही संरक्षण नसेल, त्यामुळे दुखापतीची शक्यता आणखी वाढू शकते."भारताचा कर्णधार शुबमन गिलने आधी सांगितलं होतं की, ऋषभ पंत चौथ्या कसोटीआधी पूर्णपणे फिट होईल. भारतीय संघाचा सहाय्यक प्रशिक्षक रायन डे डोशेटने देखील ऋषभ पंतच्या दुखापतीबाबत अपडेट दिली होती.

# महाईन्यूज

ePaper

। रविवार ।

।दि. 20 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

**Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26**

**Admission Schedule for F.Y.B.Pharm**

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

## ‘निर्भय कन्या’ अभियानामधून

# अभिषेक इंटरनॅशनल स्कूलमध्ये ‘ग्रीन डे’ साजरा

## शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अभिषेक इंटरनॅशनल स्कूल, मोशी येथे ग्रीन डे उत्साहात, साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करणे व निसर्गप्रेमाची भावना वाढवणे हा होता.**

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने निसर्गाचे सौंदर्य विविध चित्रांतून दाखवले. झाडे, फुले, पर्वत, नद्या यांसारख्या दृश्यांनी भरलेली ही चित्रे पर्यावरणाच्या सौंदर्याची साक्ष देत होती. या निमित्ताने घोषवाक्य लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. ६ ते १० विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन व हरित जीवनशैली या विषयावर घोषवाक्ये तयार केली. ही प्रेरणादायी घोषवाक्ये शाळेच्या भिंतींवर लावण्यात आली, ज्यामुळे पर्यावरणाविषयी जागरूकतेचा प्रसार झाला. विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन मानव झाडाची रचना केली. या उपक्रमाद्वारे एकतेचा संदेश व निसर्गाशी आपले नाते अधोरेखित करण्यात आले. हा अनोखा प्रयोग सर्वांनी आनंदाने अनुभवला. सर्व शिक्षक व विद्यार्थी हिरव्या रंगाच्या पोशाखात शाळेत दाखल झाले. हिरवा रंग ही निसर्गाची ओळख असल्याने संपूर्ण वातावरणात ताजेपणा आणि सजीवता निर्माण झाली. या निमित्ताने साजऱ्या झालेला ग्रीन डे विद्यार्थ्यांसाठी केवळ एक उपक्रम नव्हता, तर भविष्यासाठी सकारात्मक आणि शाश्वत विचारांची बीजे पेरणारा अनुभव ठरला.





KAMALA Education Society

KES'S PRATIBHA GROUP OF INSTITUTES'

# PRATIBHA COLLEGE OF COMMERCE & COMPUTER STUDIES

ACCREDIATED WITH GRADE A NAAC

Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN FOR THE YEAR 2025-26

UG & PG Courses in Arts, Commerce, Science, Computer Science & Management

- B.A. English/ Economics/ Psychology
- B.Com. Regular
- B.Com. Business Management
- B.Com. International Business
- B.Com. Computer Application
- B.Sc. Chemistry
- B.Sc. Statistics
- B.Sc. Cyber Security
- B.Sc. Computer Science
- B.Sc. Computer Application
- B.Sc. Data Science
- B.Sc. Information Technology
- M.Com
- B.Sc. Cyber & Digital Sci.
- B.Sc. Nano Sci. & Nano Tech.
- B.Sc. AI & Machine Learning
- PH.D. Commerce & Management
- M.Sc. Cyber Security
- M.Sc. Data Science
- M.Sc. Computer Science
- M.Sc. Computer Application
- M.Sc. Statistics/ Organic Chemistry
- M.A. English/ Psychology
- PH.D. English

Eligibility: For Under Graduation : Passed 12th (HSC) | for Post Graduation: Graduation in respective field

For Admission Enquiry Call : 8600189162, Timings: 9 am to 5 pm

Campus: Block D-III, Plot No. 3, Behind Mehta Hospital, Old Mumbai Pune Highway, Kalbhor Nagar, Chinchwad, Pune 19

For more details please visit us at: www.pcccs.org.in


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org